कर्मचारी वर्ग खाते
परिपत्रक क्र. ११/९४

क्र. राप/कर्मवर्ग/६१०-वै/३३५२
म. रा. मा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई - ४०० ००८. दिनांक : ११.७.१९९४.

प्रादेशिक व्यवस्थापक,
रा. प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर.

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा. प. मध्यवर्ती कार्यशाळा,
दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.

व्यवस्थापक [प्रशिक्षण],
रा. प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

विभाग नियंत्रक,
रा. प. भांडार विभाग, कुर्ला, मुंबई/मुंबई/धुळे/जळगांव/नाशिक/
पालघर/रायगड [पेण]/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/पुणे/अहमदनगर/
कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/
लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/अकोला/अमरावती/
भंडारा/बुलढाणा/चंद्रपूर/वर्धा/यवतमाळ.

विषय : रजेचे स्वरुप निश्चित न केलेला कालावधी उपदान देयक निश्चिती करतांना हिशोबात घेण्याबाबत.

...

शासकीय लेखा परिक्षकास असे आढळून आले आहे की, काही विभागांमध्ये कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या रजेचे स्वरुप प्रकरणपरत्वे त्यांच्या सेवानिवृत्ती, राजीनामा, सेवा समाप्ती किंवा प्रसंगी मृत्यू पर्यंत निश्चित केले जात नाही आणि ह्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांच्या उपदानाच्या रकमेचा हिशोब करतांना अडचणी निर्माण होतात, असेही निदर्शनास आलेले आहे की, काही विभागांमध्ये उपदानाच्या प्रयोजनार्थ अखंडित सेवाकाळासाठी अशा रजेचा कालावधी देखील हिशोबात घेतात, तर काही विभागांत सेवाकाळ हिशोबात घेतला जात नाही. रजेचे स्वरुप निश्चित न केलेला अनुपस्थितीचा कालावधी, उपदानाचा हिशोब करतांना उपदान अधिनियम कलम २-अ [अ] व कलम ४[१] मधील तरतूद विचारात न घेता एकूण सेवा कालावधीतून वजा केला जातो. ह्या सर्व बाबी आक्षेपार्ह असून कार्यालयीन कामात गुंतागुंत करणाऱ्या आहेत. ह्या सर्व बाबींचे परिक्षण केल्यानंतर आता असे सूचित करण्यात येते की, कर्मचाऱ्यांच्या रजेचे स्वरुप कोणत्याही परिस्थितीत एका महिन्याच्या कालावधीत निश्चित करणे हे

..२..